# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक








vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | गुरूवार दि.१४ मे २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २५२ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Thrusday 14 May 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 252 | Pages 4 | Rate 4 Rs


# खासगी ट्रॅव्हल्सची लूट थांबणार!

## १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत; परिवहन मंत्र्यांचे महत्त्वाचे निर्देश

### प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही

**प्रताप सरनाईक म्हणाले, सध्या अनेक खासगी ट्रॅव्हल्स कंपन्या अनधिकृत प्सच्या माध्यमातून प्रवाशांचे बुकिंग करत असल्याच्या तक्रारी प्राप्त होत असून सण-उत्सव किंवा सुट्ट्यांच्या काळात प्रवाशांकडून अव्वाच्या सव्वा तिकीट दर आकारले जातात. प्रवाशांची आर्थिक लूट करणाऱ्या अशा प्रवासी बस वाहतूकदारांवर कठोर कारवाई झाली पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत प्रवाशांची लूट खपवून घेतली जाणार नाही.**

### १ जूनपासून सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत

**राज्यातील एसटी बस आणि बसस्थानकांच्या अस्वच्छतेबाबत प्रवाशांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होत असून बसस्थानकांचा कायापालट करण्यासाठी आणि कायमस्वरूपी स्वच्छता राखण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येत आहेत. १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवरील स्वच्छतागृहे मोफत करण्यात येणार असून, प्रवाशांना उत्तम दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे.**

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यात खासगी प्रवासी बस वाहतुकीदारांकडून केली जाणारी बेकायदेशीर दरवाढ आणि अनधिकृत मोबाईल प्सद्वारे प्रवाशांची होणारी आर्थिक पिळवणूक याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून प्रवाशांकडून तक्रारी येत आहेत. याबाबत आता शासनाने गंभीर दखल घेतली आहे. तसेच या बैठकीत १ जूनपासून महामंडळाच्या सर्व बसस्थानकावरील स्वच्छतागृहे मोफत करण्याचा निर्णयही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी घेतला आहे.या संदर्भातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी तसेच दीर्घकालीन उपाययोजना सुचविण्यासाठी सह परिवहन आयुक्त आणि सुराज्य अभियानातील तीन प्रतिनिधींचा समावेश असलेली विशेष समिती गठित करण्याचे महत्त्वपूर्ण निर्देश मंत्रालयात आयोजित बैठकीत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत.

या बैठकीस परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच सुराज्य अभियान संघटनेचे अभिषेक मुरुकटे, अरविंद पानसरे, सुनील हनवट आदी उपस्थित होते. गठित समिती खासगी बसच्या भाडेवाढीवर नियंत्रण मिळवणे, अवैध बुकिंग प्सना आळा घालणे आणि प्रवाशांच्या तक्रारींवर प्रभावी उपाययोजना सुचविणे याबाबत सविस्तर अहवाल सादर करेल. समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील बैठकीचे आयोजन करण्यात येईल. समितीने सुचविलेल्या उपाययोजनांची राज्य सरकारकडून प्रभावी आणि तातडीने अंमलबजावणी केली जाईल, असे आश्वासन सरनाईक यांनी दिले आहेत.



### बसस्थानकांवरील संपर्क यंत्रणा अधिक सक्षम करणे आवश्यक

राज्यातील बसस्थानकांवरील संपर्क यंत्रणा अधिक सक्षम आणि प्रभावी करणे आवश्यक असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक बसस्थानकावर प्रवासी सुविधांसाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, परिवहन विभागाने नावे बदललेल्या गावांबाबत आणि व्याकरणदृष्ट्या अचूक मराठी भाषेचा वापर करण्याबाबत परिपत्रक जारी करावे व त्याची काटेकोर अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश प्रताप सरनाईक यांनी दिले.

# राष्ट्रीय महामार्गालगतच्या अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा

## अतिक्रमण हटाव मोहिमेला सुरुवात; कळंब रोडवरील अतिक्रमण मात्र जैसे थे

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गालगत करण्यात आलेल्या अतिक्रमणांवर प्रशासनाने आजपासून कारवाईला सुरुवात केली असून अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे शहरात मोठी खळबळ उडाली आहे. प्रशासनाच्या पथकाने महामार्गालगत उभारण्यात आलेले शेड, पत्रे, फलक व इतर अतिक्रमणे हटविण्याची मोहीम हाती घेतली आहे.

अनेक अतिक्रमणधारकांनी प्रशासनाच्या सूचनेनंतर स्वतःहून अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली आहे. मात्र कळंब रोड परिसरातील अतिक्रमण अद्यापही जैसे थे असल्याचे दिसून येत आहे.



केज शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग कायम वाहतूक कोंडीचा विषय ठरत आहे. लॉकडाऊनच्या काळात या रस्त्याचे मजबुतीकरण व सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम करण्यात आले होते. मात्र हे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याची चर्चा त्या वेळी मोठ्या प्रमाणावर झाली होती. शहरातील नागरिकांनी अनेकदा याबाबत नाराजी व्यक्त केली होती. वाढती गर्दी, रस्त्यालगत वाढलेले अतिक्रमण आणि अव्यवस्थित पार्किंग यामुळे नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले होते.

आज प्रशासनाने सुरू केलेल्या मोहिमेमुळे शहरातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे काही व्यावसायिकांनी स्वतःच्या जागेसमोर लोखंडी शेड व पत्रे टाकून रस्त्याच्या हद्दीत अतिक्रमण केले होते. अशा अतिक्रमणांवरही प्रशासनाने कारवाई सुरू केली आहे.

मात्र कळंब रोड परिसरातील काही अतिक्रमणांवर अद्याप कारवाई झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. कारवाई सर्वांवर समान झाली पाहिजे, कोणालाही अभय मिळता कामा नये, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

पुढील काही दिवसांत आणखी मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण हटविण्यात येण्याची शक्यता असून कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय प्रशासनाने निष्पक्ष कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.


# चिमुकल्याचा करुणमृत्यू नंतर भुसावळ नगरपालिकेला आली जाग

दैनिक वादळ वार्ता

**जळगाव । जितु इंगळे**

भुसावळ नारायण नगर परिसरात २४ एप्रिल रोजी शाळेत जात असताना कुत्र्यांच्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या १० वर्षीय तारकेश्वर झोपे या विद्यार्थ्याचा उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेनंतर संतप्त नागरिकांनी संबंधित कुत्र्यांच्या मालकावर कठोर कारवाईची मागणी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तारकेश्वर झोपे हा सकाळी शाळेसाठी घराबाहेर पडला असताना परिसरातील कुत्र्यांनी त्याच्यावर अचानक हल्ला केला. या हल्ल्यात त्याच्या चेहऱ्यावर व शरीरावर गंभीर जखमा झाल्या होत्या. सुरुवातीला जळगाव येथे उपचार करून नंतर त्याला मुंबई येथील रुग्णालयात हलविण्यात आले होते. मात्र उपचार सुरू असतानाच त्याचा मृत्यू झाला.

या घटनेनंतर नारायण नगर परिसरात नागरिकांनी मोठी गर्दी करत संताप व्यक्त केला. कुत्र्यांचे मालक म्हणून पालिका निवृत्त कर्मचारी प्रकाश कोळी यांचे नाव समोर आले असून, त्यांच्या घरातील पालिकेच्या डॉग व्हॅनद्वारे पाच कुत्र्यांना जप्त करण्यात आले. या कारवाईवेळी पोलीस कर्मचारी तसेच पालिका प्रशासनाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही योग्य ती उपाययोजना करण्यात आली नसल्याचा आरोप केला आहे. लहान मुलांना घराबाहेर पाठवताना भीती वाटते, अशी भावना परिसरातील महिलांनी व्यक्त केली.दरम्यान, या प्रकरणात संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी तसेच शहरातील भटक्या व पाळीव कुत्र्यांबाबत कठोर नियमांची अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# केज तालुक्यातील देवगाव परिसरात वादळीवाऱ्यासह पाऊस आंब्याचे अतोनात नुकसान

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील वादळी वाऱ्यासह पावसाने झोडपले परिसरातील आंबा पिकाचे नुकसान झाल्याने शेतकर्यांचे फारचं नुकसान झाले या बाबत सविस्तर माहिती अशी की केज तालुक्यातील देवगाव परिसरात वादळीवाऱ्यासह पाऊस झाला , त्यामुळे जोमदार आलेल्या आंब्याचे वादळी वाऱ्याने आंबे पडल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले हातातोंडाशी आलेला घास वादळी वाऱ्यामुळे मातीमोल झाल्याने शेतकरी आणखी संकटात सापडला



# शिवकालीन युद्धकला व शिवसंस्कार उन्हाळी शिबीर सांगता समारंभ उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता

**चऱ्होली । प्रतिनिधी**

नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशन, दिघी पुणे-१५ आयोजित शिवकालीन युद्धकला व शिवसंस्कार उन्हाळी शिबीराचा सांगता समारंभ दि. १३ मे २०२६ रोजी सनशाईन डड इंटरनॅशनल स्कूल,चऱ्होली येथे मोठ्या उत्साहात पार पडला.दि. ४ मे २०२६ ते दि. १३ मे २०२६ या कालावधीत चाललेल्या या १० दिवसीय शिबीरात खेळाडूंना शिवकालीन युद्धकला, मर्दानी खेळ आणि शिवसंस्कारांचे प्रशिक्षण देण्यात आले. या शिबीर मध्ये तीन दल बनवले तोरणादल, प्रतापगडदल, शिवनेरीदल असे गट तयार करून प्रत्येक दल चे सांगता शेवटी प्रात्यक्षिक करून घेतले.या शिबीर मध्ये महाराष्ट्र मधील प्रसिद्ध असे सह्याद्रीचे भुते ट्रेकर्स चे अध्यक्ष आणि दुर्गशतकवीर श्री राज दादा तपसे यांनी शिबीर मध्ये भाग घेऊन प्रशिक्षण घेतले.



सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिबीर मधील सर्व खेळाडूंचे पालक उपस्थित होते. पालकांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष स्नेह आणि प्रोत्साहन लाभले. यावेळी शिबीराचे मार्गदर्शक श्री. उदयभाऊ गायकवाड , सनशाईन स्कूल, प्रशिक्षक सौ. दिपाली जयेश पाटील, आणि नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

शिबीरात प्रशिक्षण घेतलेल्या खेळाडूंनी शिवकालीन युद्धकलेचे प्रात्यक्षिक सादर केले. खेळाडूंनी दाखवलेली शिस्त, ताकद आणि कौशल्य पाहून उपस्थित पालक व रसिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, शिवकालीन युद्धकला आणि संस्कार हे आपल्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. अशा शिबीरांमधून मुलांमध्ये शिस्त, आत्मविश्वास आणि देशाभिमान निर्माण होतो. पुढेही हा क्लास सुरु राहणार आहे असे कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी सर्व खेळाडूंना प्रमाणपत्रे देऊन गौरवण्यात आले. नवजीवन स्पोर्ट्स फाउंडेशनच्या वतीने प्रशिक्षक, पालक, सनशाईन स्कूल प्रशासन आणि उपस्थितांचे आभार मानण्यात आले.

# संपादकीय

## जलसंकटाला भिडताना...

यंदाचा उन्हाळा तापमानाचे वेगवेगळे विक्रम मोडणारा आहे. त्यामुळे पाणीसाठ्यांवर गंभीर परिणामही दिसत आहेत. मुंबई शहरात १० टक्के पाणीकपात जाहीर केली आहे. मे महिन्याच्या सुरुवातीला राज्यातील एकूण उपयुक्त पाणीसाठा सुमारे ३७ टक्क्यांवर आला असून जवळपास ६२ टक्के साठा रिकामा आहे. बहुतांश भागात तापमान ४० ते ४५ अंश सेल्सिअस दरम्यान असल्यामुळे पाण्याचा वापर सरासरी १५ ते टक्क्याने वाढलेला आहे. याचवेळी धरणांमधील बाष्पीभवनाचे प्रमाणही वाढून दररोज सुमारे ०.३ ते ०.५ टक्के साठा कमी होताना दिसतो. उपलब्ध पाणी केवळ वापरामुळे नव्हे, तर नैसर्गिकरीत्या देखील झपाट्याने घटत आहे. विभागनिहाय पाहता विदर्भातील काही भागांत तुलनेने साठा समाधानकारक असला तरी पुणे विभागात तो ३० टक्क्यांच्या खाली गेल्याने परिस्थिती अत्यंत गंभीर बनली आहे, तर मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातही मध्यम ते उच्च जोखीम निर्माण झाली आहे.राज्यातील सहा महसुली विभाग, सुमारे ४४ हजार गावे तसेच नगरपालिका व महानगरपालिका क्षेत्रांतील कोट्यवधी लोकसंख्या ही मोसमी पावसावरच अवलंबून आहे. महाराष्ट्रातील प्रमुख जलाशयांवर राज्यातील मोठी लोकसंख्या अवलंबून आहे. मुंबई महानगर प्रदेशातील सुमारे २.३० कोटी लोकसंख्या, तसेच पुणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यांसारखी शहरे आणि हजारो गावे जलाशयांवर पिण्याच्या पाण्यासाठी अवलंबून आहेत. एकूण सुमारे सात कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या जलाशयांवर थेट किंवा अप्रत्यक्षपणे अवलंबून आहे.ज्यात सुमारे २.२५ कोटी हेक्टर क्षेत्र शेतीखाली असून त्यातील मोठा भाग अजूनही पावसावर अवलंबून आहे. सिंचनाखालील क्षेत्र मर्यादित असल्याने पावसातील खंडाचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. मृग नक्षत्रात पाऊस झाला नाही, तर दुबार पेरणीचे संकट उभे राहू शकते. त्यामुळे जलाशयांतील पाणीपातळी कमी झाली की त्याचा परिणाम सर्वच क्षेत्रांवर होतो. राज्यातील सिंचन व्यवस्थेचे स्वरूप पाहता भूजलावर असलेले प्रचंड अवलंबित्व स्पष्ट होते. लघुसिंचन पाहणी (२०१३–१४) नुसार महाराष्ट्रात विहिरी आणि ट्युबवेल असे एकूण २६ लाख भूजल स्रोत आहेत. पावसातील अनिश्चितता वाढली की भूजलसाठ्यावर ताण वाढतो आणि जलपातळी झपाट्याने खाली जाते. विशेषतः मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रातील भागात खोल कूपनलिकांची (सुमारे ५०० फुटांपेक्षाही अधिक) संख्या वाढत असल्याने जलस्रोतांची दीर्घकालीन शाश्वतता धोक्यात येत आहे. जलशक्ती मंत्रालयाने २०२२ साली पहिली जलस्रोत गणना केली. त्यानुसार एकूण ९७,०६२ जलस्रोत असून ९६,३४३ जलस्रोत ग्रामीण भागात आहेत. त्यापैकी ५१,९५९ शासकीय मालकीचे आहेत तर ४१,३५१ हे पंचयातींच्या अखत्यारीत येतात.भूजलावर राज्याचा मोठा भार आहे. सुमारे २६ लाखांहून अधिक विहिरी आणि कूपनलिका कार्यरत असून तोच शेती आणि पिण्याच्या पाण्याचा मोठा स्रोत आहे. भूजलाचा अधिक उपसा होत असल्याने, अनेक भागांत भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. घटती भूजल पातळी आणि तलावांतील झपाट्याने कमी होत असलेला जलसाठा या चिंतेच्या बाबी आहेत. दुसरीकडे, राज्यातील ५४ नदीपट्टे प्रदूषित असल्यामुळे उपलब्ध पाणीही वापरण्यास अयोग्य ठरत आहे. त्यामुळे पाण्याची कमतरता आणि पाण्याची गुणवत्ता या दोन्ही समस्या गंभीर बनल्या आहेत.जे जुने जलाशय आहेत अथवा लघुसिंचन/कोल्हापूर पद्धतीचे बंधारे/ तलाव आहेत, त्यांची मोठ्या प्रमाणावर तूटफूट झाली असून या परिस्थितीमुळे जलाशयांतील साठा टिकून राहत नाही आणि भूजल पुनर्भरण कमी होते. उन्हाळ्याच्या अखेरीस अनेक धरणांतील पाणीपातळी २० ते ३० टक्क्यांपर्यंत खाली येते, विशेषतः मराठवाडा आणि उत्तर महाराष्ट्रात ही स्थिती अधिक गंभीर असते.पिण्याचे पाणी आणि गुरांसाठीचे पाणी हा प्राधान्यक्रम असतो. त्यानंतरच शेती, उद्योग आणि इतर वापराचा विचार करणे आवश्यक आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा ही केवळ तात्पुरती उपाययोजना आहे. टँकरने पाणी देण्यासाठीही पाण्याचा स्रोत जवळ असणे अत्यंत गरजेचे आहे; अन्यथा वाहतूक खर्च वाढतो आणि पुरवठा अनियमित होतो. त्यामुळे स्थानिक पातळीवर जलस्रोतांचे जतन आणि जवळच्या स्रोतांचा वापर ही महत्त्वाची बाब आहे. पिण्यासाठी टँकरने पाणी आणि गुरांसाठी छावण्या असे चित्र दिसायला नको.एकूणच महाराष्ट्रातील पाणीसंकट हे केवळ पावसाच्या कमतरतेमुळे नव्हे, तर व्यवस्थापनातील त्रुटींमुळे अधिक गंभीर झाले आहे. पिण्याचे पाणी आणि पशुधनाचे पाणी यांना सर्वोच्च प्राधान्य देत, उर्वरित वापराचे नियोजन केले तरच या संकटावर मात करता येईल. अन्यथा, येणाऱ्या काळात पाणीटंचाई हे मोठे सामाजिक आणि आर्थिक संकट ठरू शकते.राज्यातील जलस्रोतांच्या व्यवस्थापनात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. भारत सरकारच्या 'वॉटर बॉडी सेन्सस'नुसार महाराष्ट्रातील जलस्रोतांची संख्या मोठी असली तरी त्यांचा कार्यक्षम वापर मर्यादित आहे. या पार्श्वभूमीवर ७३ व ७४ व्या घटनादुरुस्ती अंतर्गत ग्रामपंचायत आणि नागरी संस्था यांना जलव्यवस्थापनाची स्पष्ट जबाबदारी देण्यात आली आहे. गाव पातळीवर जलस्रोतांची नोंद, गाळ काढणे, पाणलोट व्यवस्थापन आणि पाणी बजेट तयार करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नगरपातळीवर जलसंधारण, गळती नियंत्रण, सांडपाणी पुनर्वापर आणि पावसाच्या पाण्याचे संकलन या बाबी नगर आराखड्यात अनिवार्य करणे गरजेचे आहे. जलस्रोतांचे संरक्षण आणि शाश्वत वापर सुनिश्चित करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सक्रिय भूमिका बजावणे ही काळाची गरज आहे.मागील दशकात राज्याने पाणीपुरवठ्यावर भर देण्याऐवजी पाणी कमावणे आणि त्याचा योग्य वापर अशी भूमिका घेतल्याचे दिसते. राज्य शासनाच्या २०१५ ची जलयुक्त शिवार योजना, त्यानंतरची गाळमुक्त तलाव आणि गाळयुक्त शिवार, जलयुक्त शिवर ३.० आणि नुकताच राज्याने घेतलेला नदी प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय तसेच राज्याने २९ एप्रिल रोजी एकात्मिक जलव्यवस्थापन राज्यस्तरीय समिती स्थापन करण्याचा निर्णय अशा काही जलयोजना दिसतात. हे धोरणात्मक निर्णय तर योग्य आहेत, पण प्रत्यक्षात म्हणावे तसे बदल दिसत नाहीत. जलसाक्षरता आणि 'चला जाणू या नदीला' हे नदी साक्षरता अभियान असे विषय अनुपयुक्त न समजता ते या धोरणात्मक निर्णयांशी पूरकच आहेत म्हणून त्यांना जोडून घेणे गरजेचे आहे.एल–निनोच्या पार्श्वभूमीवर यंदा पावसात खंड पडण्याची शक्यता आहे; मात्र केवळ एल–निनोच नव्हे तर गेल्या काही वर्षांत पावसाचा स्वभावच बदललेला दिसतो. कमी कालावधीत अतिवृष्टी आणि नंतर दीर्घ खंड अशी पावसाची पद्धत निर्माण झाली आहे. याचा थेट परिणाम मातीच्या गुणवत्तेवर झाला असून मातीची पाणीधारण क्षमता घटली आहे. परिणामी, पावसाचे पाणी जमिनीत मुरण्याऐवजी वाहून जाते आणि भूजल पुनर्भरण कमी होते. दुसरीकडे शेती आणि नागरी भागातील पाण्याच्या वाढत्या मागणीमुळे विहिरी व ट्युबवेल्सवर ताण वाढत असून भूजल पातळी सातत्याने खाली जात आहे. अशा परिस्थितीत 'दुष्काळात तेरावा महिना' या म्हणीप्रमाणे, पावसातील खंड आणि भूजल घट यांचा दुहेरी परिणाम राज्यावर दिसून येत आहे.

# नीट (NEET) पेपर लिक प्रकरणी राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (NTA) महासंचालक अभिषेक सिंह यांची हकालपट्टी करून अटक करा–हर्षवर्धन सपकाळ

## भाजपाच्या राजवटीत गुन्हेगारांना अभय मिळत असल्यानेच पेपर लिक करणारे माफिया मोकाट; लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ

### नीट पेपर रद्द झाल्याने डॉक्टर बनण्याच्या लाखो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांचा चुराडा; भाजपा सरकारला एक परिक्षाही घेता येत नाही का?

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे सरकार केंद्रात व अनेक राज्यात आल्यापासून गुन्हेगारीने डोके वर काढले असून शिक्षण क्षेत्रातही माफियाराजचा धुडगुस सुरु आहे. भाजपा सरकारला एक परिक्षाही सुरळीत पार पाडता येत नाही अशी अवस्था झाली. छएएढ चा पेपर फुटल्याने ही परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्याची नामुष्की ओढवली आहे. भाजपाच्या राजवटीत गुन्हेगारांना अभय मिळत असल्यानेच पेपर लिक करणारे माफिया मोकाट सुटलेत. नीट (NEET) पेपर लिक प्रकरणी राष्ट्रीय चाचणी संस्थेचे (NTA) महासंचालक अभिषेक सिंह यांची हकालपट्टी करून अटक करा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.यासंदर्भात प्रतिक्रिया देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ पुढे म्हणाले की, दिनांक ३ मे रोजी नीट ची परिक्षा देशभर पार पडली. वर्षभर अभ्यास करून विद्यार्थ्यांनी परिक्षेला सामोरे जायचे आणि या अत्यंत महत्वाच्या परिक्षांचे पेपर लिक होतात हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी मांडलेला खेळ आहे. आता पुन्हा परीक्षा द्यावी लागणार आहे, फेरपरीक्षेमुळे केवळ २२ लाख विद्यार्थ्यांनाच नाहक त्रास होणार नाही तर २२ लाख कुटुंबांना त्याचा त्रास होणार आहे. नीट परिक्षा ही अनेक वर्षांची कठोर मेहनत, त्याग, शिस्त आणि डॉक्टर बनण्याच्या स्वप्नाचे प्रतीक आहे. पेपर रद्द होण्याने लाखो विद्यार्थी व त्यांच्या पालकांच्या आशा, आकांशा व स्वप्नांचा चुराडा केलेला आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या कार्यकाळात दुसऱ्यांदा नीट परिक्षेत गडबड झाली आहे. NEET-UG 2024 साली पेपरफुटी झाली होती, केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी सुरुवातीला पेपर फुटीचे आरोप फेटाळले होते, परंतु नंतर बिहार आणि हजारीबाग येथे गैरप्रकार झाल्याचे मान्य केले होते व दोषींवर कारवाईचे आश्वासनही दिले होते पण त्यात काही फरक पडल्याचे



आत्ताच्या पेपरफुटीवरून दिसत नाही. काँग्रेससह इतर पक्षांचे सरकार असले की भाजपा मंत्र्याचा राजीनामा मागत असे, पण २०१४ पासून घटना कितीही गंभीर असो भाजपाचा मंत्री राजीनामा दिल्याचे उदाहरण दिसत नाही. महाराष्ट्रातही देवेंद्र फडणवीस यांच्या काळात पेपर फुटीचे अनेक प्रकार झाले पण त्यावर कठोर कारवाई झाली नाही उलट चुकीच्या बातम्या दिल्या जातात, त्यांच्यावरच कारवाई करू असे उद्धट विधान मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले होते. दिनांक २ मे २०२६ रोजी झालेल्या एसआरपीएफ दौंड शिपाई भरतीच्या लेखी परीक्षेतील १०० पैकी तब्बल ८५ प्रश्न एका खासगी प्रकाशकाच्या पुस्तकातून जसेच्या तसे विचारण्यात आले होते, हा सुद्धा स्पर्धा परिक्षेतील गैरप्रकारच आहे. भाजपा सरकारला परिक्षाही घेता नाहीत हे अकार्यक्षम सरकारचे लक्षण आहे. देशभरातील विद्यार्थी व पालक भाजपाच्या या अकार्यक्षम व कुचकामी सरकारला माफ करणार नाहीत. काँग्रेस पक्ष नेहमीच जनतेचा आवाज उठवत आला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी सरकारला जाब विचारण्यासाठी काँग्रेस पक्ष विद्यार्थ्यांसोबत आहे, असेही सपकाळ म्हणाले.

# संगमेश्वर येथील संभाजी नगर रस्त्याच्या मागणीसाठी ग्रामस्थांचे उपोषण सुरू

## दोन दिवस उलटूनही प्रशासनाकडून दखल नाही

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

संगमेश्वर तालुक्यातील नावडी ग्रामपंचायत हद्दीतील संभाजीनगर वस्तीला जाणाऱ्या रस्त्याच्या खडीकरण व डांबरीकरणाच्या कामासाठी ग्रामस्थांनी वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याने अखेर ग्रामस्थांनी आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे.या संदर्भात ११ मे रोजी उपोषणाचा इशारा प्रशासनाला देण्यात आला होता.

मात्र त्यानंतरही प्रशासनाने याची गंभीर दखल न घेतल्याने सोमवार, दि. ११ मे पासून ग्रामस्थांनी प्रत्यक्ष उपोषणाला सुरुवात केली आहे. आज उपोषणाचा दुसरा दिवस असून अद्याप कोणत्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी किंवा लोकप्रतिनिधींनी उपोषणस्थळी भेट दिलेली नसल्याने




ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

संभाजीनगर वस्तीला जाणारा रस्ता अनेक वर्षांपासून अत्यंत खराब अवस्थेत असून पावसाळ्यात नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो.

४० शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच रुग्णांना या रस्त्यामुळे मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर असूनही प्रत्येक्षात कामास सुरुवात होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही उपोषणकर्त्यांनी दिला आहे.

# हे आताच का सुचलं,राज ठाकरेंचा सवाल

दैनिक वादळ वार्ता
**मुंबई । प्रतिनिधी**

पेट्रोल, डिझेलच्या वापरात काटकसर करा असं पंतप्रधान सांगतात. ठीक आहे. मग हे आत्ताच का सुचलं ? पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि इतर राज्यांच्या निवडणुकीत प्रचार, रोड शो करताना आणि देशभरातून लाखो माणसं त्या त्या राज्यात नेताना जे कोट्यवधी लिटर्स पेट्रोल, डिझेल वाया गेलं तेंव्हा का नाही सुचलं ? असा सवाल मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी विचारला आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला सलग आवाहन केले आहे. म्हणजे पेट्रोल–डिझेलचा वापर जपून करा, पुढील एक वर्ष सोनं खरेदी करू नका, मेट्रोचा सार्वजनिक परिवहन सेवेचा वापर करा. असे आवाहन त्यांनी देशातील जनतेला केलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या भूमिकेनंतर विरोधकांना एक मुद्दा मिळाला आहे. त्यांनी सरकारला धारेवर धरायला सुरुवात केली आहे. सरकारची आर्थिक धोरण फसल्याची टीका काही जणांकडून सुरु आहे, तर हे मोदी सरकारच अपयश असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी एक फेसबुक पोस्ट लिहून मोदी यांच्या राजकीय आणि आर्थिक धोरणांवर जोरदार टीका केली आहे. राज ठाकरे यांनी मोदी सरकारला कोंडीत पकडणारे प्रश्न विचारले आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदी पेट्रोल–डिझेलचा वापर कमी करा, विजेवर चालणाऱ्या गाड्या जास्त वापरा असं सांगत आहेत. बरं, मग स्वतः पंतप्रधान आणि त्यांचे सगळे सहकारी देशभर काही शे गाड्यांचा ताफा घेऊन मिरवणुका काढत आहेत, स्वतःवर फुलं उधळून घेत आहेत त्याचं काय करणार आहात आपण ? असा सवाल राज ठाकरेंनी विचारला आहे. २००८



ला पुढे २०११–२०१ अरब स्प्रिंगच्या वेळेस, २०१३–१४ च्या काळात (जेंव्हा भाजपवाले खनिज तेलाच्या किंमती आणि देशाची इभ्रत यावर तावातावाने बोलत होते तो काळ), पुढे अशीच परिस्थिती २०२२ आणि २०२३ च्या दरम्यान जेंव्हा ओपेकने खनिज तेलाचं उत्पादन कमी करण्याचा निर्णय घेतला तेंव्हा देखील बॅरलचा भाव ९० ते १०० डॉलर्सच्या दरम्यान गेला होता. या घटनांपैकी ३ ते ४ वेळा मनमोहन सिंग पंतप्रधान होते आणि एकदा तर स्वतः मोदी पंतप्रधान होते. मनमोहन सिंग यांनी असं आवाहन केलं नाही की तेंव्हा मोदींनी केलं नाही. मग आत्ताच का ? काटकसर करा हे आवाहन करताना खरं कारण देशाच्या आणि राज्याराज्यांच्या अर्थव्यवस्थेचं जे काही कंबरडं मोडून ठेवलं आहे त्याबद्दल पंतप्रधान काहीच बोलत नाहीयेत अशी टीका राज ठाकरे यांनी केली.ज्या रेवडी संस्कृतीची पंतप्रधानांनी खिल्ली उडवली त्याच रेवड्या मग २०२४ ची महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक असो की त्यानंतरच्या बिहार, पश्चिम बंगाल निवडणूका असोत की इतर कुठल्याही निवडणुका 'रेवड्या' वाटूनच निवडणुका जिंकल्यात. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेने राज्याची अर्थव्यवस्था मोडकळीला आणली. महिलांना सक्षम करायचं सोडून त्यांना तुटपुंजे पैसे द्यायचे आणि ते पैसे महागाईच्या रूपाने पुन्हा काढून घ्यायचे. देशाची आणि राज्याची अर्थव्यवस्था जर नाजूक झाली आहे तर या रेवड्या वाटू नका असं पंतप्रधान ठामपणे सांगणार आहेत का ? असाही सवाल राज ठाकरे यांनी केला आहे.राज ठाकरे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला केलेल्या आवाहनावर सवाल करताच भाजपला मिरच्या झोंबल्या जात आहेत.काटकसरीच आवाहन केल्यानंतर लगेच राज ठाकरे यांच्या पोटात दुखायला लागलं. खरंतर राज ठाकरे यांनी मोदींना सल्ला देण्याऐवजी आपल्या पक्षाच्या बाबतीत, पक्षाच्या धैय्य धोरणांसाठी, पक्ष वाढीसाठी एवढ मोठं ट्विट लिहिल असतं, तर जास्त फायदा झाला असता. परंतु राज ठाकरे आपल्या पक्षाची झालेली वाताहात पहायला तयार नाहीत. ते पंतप्रधान मोदींना सल्ला देत आहेत अशा प्रकारे बिनबुडाची टिका भाजप करत आहे.

# सबस्टेशन आणि पुलाच्या चुकीच्या कामामुळे भाकरवाड-देहेन गावावर महापुराचे संकट; प्रशासनाविरोधात ग्रामस्थ आक्रमक

## वारंवार निवेदन देऊनही प्रशासन झोपेत; १९८९ आणि २०१७ च्या महापुराची पुनरावृत्ती होण्याची भीती

दैनिक वादळ वार्ता
**अलिबाग | प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील भाकरवाड-देहेन परिसरात सुरू असलेल्या सबस्टेशन आणि पुलाच्या बांधकामामुळे भविष्यात मोठ्या महापुराचे संकट ओढवण्याची भीती व्यक्त करत ग्रामस्थ आणि शेतकरी आक्रमक झाले आहेत. गावकऱ्यांच्या जीवाशी खेळणारे नियोजन सुरू असून प्रशासन मात्र बघ्याची भूमिका घेत आहे, असा संतप्त आरोप ग्रामस्थांनी केला आहे.ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधित सबस्टेशनचे काम गावकरी आणि शेतकऱ्यांना विश्वासात न घेता थेट मुख्य पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहाच्या जागेवर सुरू करण्यात आले आहे. अतिवृष्टीच्या काळात भाकरवाड-देहेन मुख्य रस्त्यावरून अडीच ते तीन फूट पाणी वाहत असते. मात्र आता सबस्टेशनमुळे हा पाण्याचा मार्ग अडवला जाणार असल्याने हे पाणी थेट गावातील सखल वस्तीत शिरून मोठ्या प्रमाणात नुकसान करू शकते.सन १९८९ मध्ये आलेल्या महापुरात गावातील घरांमध्ये पाणी शिरून ग्रामस्थांचे प्रचंड नुकसान झाले होते. त्यानंतर २०१७ मध्येही भीषण पूरस्थिती निर्माण झाली होती. त्या वेळी प्रशासनाकडून पंचनामे करून नुकसानभरपाईचे धनादेश देण्यात आले होते. तरीही आज त्याच धोकादायक परिस्थितीकडे प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे.

या प्रकल्पामुळे भातशेती पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून, शेततळ्यांमधील मत्स्य व्यवसायालाही मोठा फटका बसणार असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

दरम्यान, देहेन गावातील मोडकळीस आलेल्या पुलाच्या नव्या बांधकामावरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. सागरगड माची परिसरातून मोठ्या प्रमाणात पाणी येत असल्याने जुन्या पुलाला चार गाळे होते. मात्र नव्या पुलात केवळ दोनच गाळे ठेवले जाणार असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे नदीच्या पाण्याचा निचरा अडून भविष्यात भीषण पूरस्थिती निर्माण होण्याची शक्यता ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.विशेष म्हणजे, या गंभीर प्रश्नाबाबत मा. ग्रामपंचायत सदस्य प्रीती प्रवीण पाटील (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष), मा. ग्रामपंचायत सदस्य प्रकाश पाटील तसेच ग्रामस्थांनी भूसंपादन उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, सर्कल अधिकारी, तलाठी आणि पोयनाड पोलीस स्टेशन यांना वेळोवेळी निवेदन देऊन परिस्थितीची गंभीरता लक्षात आणून दिली होती. मात्र संबंधित प्रशासन आणि यंत्रणांनी अद्याप कोणतीही ठोस दखल घेतली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.देहेन-भाकरवाड रस्ता दरवर्षी जून ते ऑक्टोबरदरम्यान अनेकदा पाण्याखाली जातो आणि गावांचा संपर्क तुटतो. तरीही प्रत्यक्ष परिस्थितीचा अभ्यास न करता कामे सुरू असल्याने भविष्यात मोठी जीवित आणि वित्तहानी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.याचबरोबर कामाबाबत विचारणा करण्यासाठी गेलेल्या ग्रामस्थांना कंत्राटदारांकडून पोलिस संरक्षणाच्या आड दमदाटी केली जात असल्याचाही गंभीर आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ग्रामस्थ आणि शेतकरी न्यायप्रक्रियेपासून वंचित राहत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

आमचा विकासकामांना विरोध नाही, पण गावकऱ्यांच्या जीवाशी खेळणारे नियोजन आम्ही सहन करणार नाही. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन पाण्याच्या निचऱ्याबाबत योग्य उपाययोजना कराव्यात. अन्यथा भविष्यात होणाऱ्या मनुष्यहानी आणि मोठ्या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे.



# प्रेमसंबंध लपवण्यासाठी पत्नीचा थरार; पती अडसर ठरल्याने जीवे मारण्याचा आखला डाव

दैनिक वादळ वार्ता
**कळंब | प्रतिनिधी**

कळंब तालुक्यातील पंगडी येथे प्रेमसंबंधात अडथळा ठरत असल्याच्या रागातून पत्नीने पतीला विजेचा शॉक देऊन ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पत्नी व तिच्या कथित प्रियकराविरुद्ध वडगाव जंगल पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी गजानन मोरे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३ मे रोजी मध्यरात्री ते घरात झोपलेले असताना पत्नी कवडी मोरे हिने विद्युत वायरला ॲल्युमिनियम तार जोडून त्यांना विजेचा शॉक देण्याचा प्रयत्न केला. मात्र, सुदैवाने गजानन मोरे हे यातून बचावले. या कटामागे तिचा कथित प्रियकर विष्णू आत्राम याचा सहभाग



असल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, पोलिसांनी कवडी मोरे व विष्णू आत्राम यांच्याविरुद्ध बीएनएस कलम १०९(१), ६१(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे.

> आरोपी ग्रामपंचायत सदस्य आहे. यापूर्वी त्याच्यावर अवैध दारू विक्रीप्रकरणी गुन्हे दाखल आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.
> –विकास दांडे, पोलीस निरीक्षक, वडगाव जंगल.

# शिवाजी कोण होता? पुस्तक वाचनातून बाळासाहेब आंबेडकर यांचा वाढदिवसा निमित्त स्वाभिमान दिवस उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता
**माजलगाव | प्रतिनिधी**

प्रकाश तथा बाळासाहेब आंबेडकर यांच्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे दिनांक १० मे वार रविवार रोजी स्वाभिमान दिवस साजरा करण्यात आला. यावेळी शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे सामूहिक वाचन आणि वाटप करून अनोख्या पद्धतीने अभिवादन करण्यात आले. वंचित बहुजन आघाडीच्या वतीने सुंदरराव सोळंके महाविद्यालयासमोर हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाचे आयोजन व नेतृत्व वंचित बहुजन आघाडीचे बीड माझी जिल्हाउपाध्यक्ष सचिन उजगरे यांनी केले. यावेळी भारतीय बौध्द महासभाचे श्रीराम मोरे, दिगांबर कचरे पाटील,



युवा उद्योजक पद्माकर कांबळे, अशोक कांबळे, धम्मानंद भाऊ साळवे अंकुश जाधव, श्रीपाद शिंदे, विनोद टाकणखार,अभिजीत साळवे, सिध्दार्थ पौळ यांच्यासह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी शिवाजी कोण होता? या पुस्तकाचे वाचन करून सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला. तसेच बाळासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक, राजकीय आणि संविधानवादी विचारांचा जागर करण्यात आला. कार्यक्रमात जयभीम आणि जय संविधानच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.या कार्यक्रमासाठी दत्ता कचरे, अजय शेरकर, विष्णू शेरकर, शरद काळे , सय्यद छोटू वैभव काळे ,आकाश काळे , अमोल गवळी , अमोल काळे , किरण फुलवरे , उमेश काळे , राजरत्न खळगे, महादेव काळे आदी प्रमुख उपस्थित होते.

# उंभर्टी गावात बिबट्याची दहशत धसक्याने साडेचारशे कोंबड्यांचा मृत्यू

## पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण; वन विभागाकडून पिंजरा व ट्रॅप कॅमेरे तैनात

दैनिक वादळ वार्ता
**धुळे | प्रतिनिधी**

धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील उंभर्टी गावात बिबट्याच्या वाढत्या वावरामुळे ग्रामस्थ आणि पोल्ट्री व्यावसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील पोल्ट्री चालक महेंद्र सावंत यांच्या पोल्ट्री फार्ममध्ये बिबट्याच्या दहशतीमुळे तब्बल साडेचारशे कोंबड्यांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे सावंत यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले असून परिसरातील इतर पोल्ट्री चालकांमध्येही चिंतेचे वातावरण पसरले आहे.मिळालेल्या माहितीनुसार, महेंद्र सावंत यांच्या शेतातील पोल्ट्री फार्म परिसरात गेल्या चार ते पाच दिवसांपासून रात्रीच्या वेळी बिबट्याचा वावर दिसून येत होता. दरम्यान, बिबट्याने



पोल्ट्री फार्म परिसरात शिरकाव केल्याने कोंबड्यांमध्ये प्रचंड घबराट निर्माण झाली. भीतीच्या धसक्यामुळे कोंबड्यांची चेंगराचेंगरी होऊन सुमारे साडेचारशे कोंबड्यांचा मृत्यू झाला. या प्रकारामुळे पोल्ट्री व्यवसायिकांना मोठा आर्थिक फटका बसला आहे.घटनेची माहिती मिळताच पशुवैद्यकीय विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेत मृत कोंबड्यांचे पोस्टमार्टम केले. प्राथमिक अहवालात कोंबड्यांचा मृत्यू हा बिबट्याच्या दहशतीमुळे झाल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.यानंतर पोल्ट्री चालक महेंद्र सावंत यांनी पिंपळनेर वनपरिक्षेत्र अधिकारी ओंकार ढोले यांच्याशी संपर्क साधून संपूर्ण घटनेची माहिती दिली. त्यानंतर वन विभागाने तातडीने हालचाल करत दिघावे परिमंडळातील वनपाल आणि वनरक्षकांना घटनास्थळी पाठवून पंचनामा केला. तसेच बिबट्याला पकडण्यासाठी परिसरात ट्रॅप कॅमेरे आणि पिंजरा लावण्यात आला. मात्र, अत्यंत चलाख असलेला बिबट्या अद्याप वन विभागाच्या जाळ्यात अडकलेला नाही.दरम्यान, सततच्या भीतीमुळे आणि वाढत्या नुकसानीमुळे महेंद्र सावंत यांनी पोल्ट्री फार्ममधील उर्वरित कोंबड्या संबंधित कंपनीकडे हलविल्या आहेत. त्यामुळे त्यांना आणखी आर्थिक फटका सहन करावा लागला आहे. पुढील बॅच पोल्ट्रीमध्ये टाकण्यासही ते धजावत नसल्याने परिसरातील इतर पोल्ट्री चालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.वन विभागाने तातडीने ठोस उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा तसेच पोल्ट्री व्यवसायिकांना संरक्षण आणि आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी महेंद्र सावंत यांनी केली आहे. उंभर्टी परिसरात वाढलेल्या बिबट्याच्या वावरामुळे ग्रामस्थांमध्येही दहशतीचे वातावरण निर्माण झाले असून वन विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# टप्पा चौकात ट्रॅफिक सिग्नलच्या मागणीसाठी नागरिकांचे आंदोलन

दैनिक वादळ वार्ता
**भद्रावती | प्रतिनिधी**

भद्रावती शहरातील वंदनीय बाळासाहेब प्रवेशद्वारासमोरील टप्पा चौकात वाढत्या वाहतूक कोंडीमुळे आणि अपघातांच्या वाढत्या धोक्याच्या पार्श्वभूमीवर ट्रॅफिक सिग्नल बसविण्याच्या मागणीसाठी सोमवारी सायंकाळी नागरिकांनी आंदोलन करत प्रशासनाचे लक्ष वेधले. शहरातील विविध सामाजिक, राजकीय आणि नागरिक प्रतिनिधींनी एकत्र येत ही मागणी लावून धरली. टप्पा चौक हा भद्रावतीतील अत्यंत वर्दळीचा आणि महत्त्वाचा मार्ग मानला जातो. या मार्गावरून दररोज शेकडो दुचाकी, चारचाकी तसेच अवजड वाहनांची ये-जा सुरू असते. विशेषतः शाळकरी विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि व्यापाऱ्यांना रस्ता ओलांडताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. वाहतुकीचे कोणतेही नियोजन नसल्यामुळे येथे वारंवार किरकोळ अपघात होत असून भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली. या आंदोलनात विनय अंबागरे, माजी नगराध्यक्ष सुनील नामोजवार, माजी नगराध्यक्ष सरिता सुर, नगरसेवक अनिल पडोळे,




नगरसेवक प्रथम गेडाम, नगरसेविका उषा जाधव, नगरसेविका पल्लवी तामगाडे, नगरसेविका सीमा पवार, तसेच कल्पना भुसारी, कल्पना मत्ते यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आंदोलकांनी हातात फलक घेऊन घोषणाबाजी करत प्रशासनाने तातडीने ट्रॅफिक सिग्नल बसवावा, अशी मागणी केली.

दरम्यान, संबंधित चौकात वाहतूक नियंत्रणासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत प्रशासनाने लवकर निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. मागणीकडे दुर्लक्ष झाल्यास पुढील काळात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

# विभागीय लोकशाही दिनात १४ प्रकरणांवर सुनावणी

## प्रलंबित तक्रारींचा तत्काळ निपटारा करा; विभागीय आयुक्त नयना गुंडे यांचे अधिकाऱ्यांना स्पष्ट निर्देश

दैनिक वादळ वार्ता
**अमरावती | प्रतिनिधी**

नागरिकांच्या तक्रारींना न्याय मिळावा आणि शासन यंत्रणेबद्दलचा विश्वास अधिक दृढ व्हावा, यासाठी विभागीय लोकशाही दिनात दाखल होणाऱ्या प्रकरणांवर वेळेत व प्रभावी कार्यवाही करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी केले. प्रलंबित प्रकरणांचा जाणीवपूर्वक पाठपुरावा करून त्यांचा तत्काळ निपटारा करण्याचे निर्देश त्यांनी सर्व विभागप्रमुखांना दिले.विभागीय आयुक्तालयाच्या सभागृहात सोमवारी पार पडलेल्या विभागीय लोकशाही दिनात अमरावती विभागातील एकूण १४ प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी अपर आयुक्त संजय जाधव, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके, सहाय्यक आयुक्त वैशाली पाथरे, गीता वंजारी यांच्यासह महसूल, पोलीस, कृषी, सहकार, ऊर्जा, जलसंधारण आणि महापालिका





विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तसेच विभागातील पाचही जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी आणि संबंधित अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.बैठकीदरम्यान दाखल झालेल्या प्रत्येक तक्रारीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. एकूण १४ प्रकरणांपैकी ४ प्रकरणे निकाली काढण्यात आली असून २ नवीन प्रकरणांची नोंद झाली. उर्वरित १२ प्रकरणांबाबत संबंधित विभागांनी स्थळ पाहणी, मुद्देनिहाय चौकशी आणि पडताळणी करून स्पष्ट अंतिम अहवाल तातडीने सादर करावेत, असे निर्देश विभागीय आयुक्तांनी दिले.

लोकशाही दिनात आलेल्या तक्रारी या सामान्य नागरिकांच्या अपेक्षा आणि शासन यंत्रणेकडून न्याय मिळविण्याचा विश्वास दर्शवतात. त्यामुळे प्रत्येक प्रकरण गांभीर्याने हाताळून विहित कालमर्यादेत कार्यवाही करणे आवश्यक आहे, असे नयना गुंडे यांनी स्पष्ट केले.

यावेळी महिला लोकशाही दिनांतर्गत एकही तक्रार प्राप्त झाली नसल्याची माहिती महिला व बालविकास विभागाने दिली. तसेच मागील लोकशाही दिनातील प्रकरणे पुढील बैठकीपर्यंत प्रलंबित राहू नयेत, न्यायप्रविष्ट आणि अर्धन्यायिक प्रकरणांबाबत वेळेत अहवाल सादर करण्यात यावेत, अशा सूचनाही संबंधित विभागांना देण्यात आल्या.लोकशाही दिनासाठी उपस्थित राहिलेल्या तक्रारदारांची मते ऐकून घेत नागरिकांच्या समस्यांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी प्रशासनाने अधिक जबाबदारीने कार्य करावे, असेही आवाहन विभागीय आयुक्तांनी केले.

# चासकमान धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी समाधान शिबिर आयोजित करावे; उपसभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांचे निर्देश

## पुनर्वसन प्रक्रियेतील प्रलंबित प्रश्नांवर ठोस निर्णय घेण्यासाठी सर्व बैठकींचा कृती अहवाल सादर करावा

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

चासकमान प्रकल्पग्रस्तांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी विशेष समाधान शिबिर आयोजित करावे. हे समाधान शिबिर प्रभावीपणे राबवून संबंधित विभागांनी त्याचे नेतृत्व करावे, तसेच शिबिराच्या माध्यमातून पुनर्वसनासाठी पात्र नागरिकांची कागदपत्रे तपासून त्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा, असे विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले.पुणे जिल्ह्यातील चासकमान धरणग्रस्तांच्या प्रलंबित पुनर्वसन प्रश्नासंदर्भात विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभाग संचालक भालचंद्र चव्हाण, सहसचिव पुनर्वसन विभाग संजय इंगळे, उपजिल्हाधिकारी पुनर्वसन पुणे स्वप्निल मोरे,चासकमान प्रकल्प पुनर्वसन समितीच्या वतीने अध्यक्ष बी.के. कदम, एल बी तनपुरे, आकाश बोंबले, बाळासाहेब दाते उपस्थित होते.उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी यापूर्वी झालेल्या बैठकींचे अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे पुनर्वसन प्रक्रियेतील तांत्रिक बाबी आणि प्रलंबित मुद्द्यांची स्पष्टता होण्यास मदत होईल. मदत व पुनर्वसन विभागाने यापूर्वी झालेल्या बैठकींचा सविस्तर तपशील सादर करून, या संदर्भात कोणते धोरणात्मक निर्णय घेता येतील याबाबतचा अहवाल १२ जूनपर्यंत सादर करावा, असेही त्यांनी सांगितले.तसेच, पुनर्वसनासंदर्भात यापूर्वी घेण्यात आलेल्या सर्व बैठकींवरील कृती अहवाल संबंधित विभागांनी तातडीने सादर करावा, असे स्पष्ट निर्देशही उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले. पुनर्वसन प्रक्रियेत झालेल्या कार्यवाहीचा सविस्तर आढावा घेऊन प्रलंबित प्रश्नांवर प्रभावी निर्णय घेण्यात यावेत, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.



## जावळी जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थिनी अंजली संतोष झिरमिरे ८६ % गुण घेऊन उत्तीण



दैनिक वादळ वार्ता

**औसा । प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील जावळी गावातील जिल्हा परिषद प्रशाला दरवर्षी शंभर टक्के निकाल देणारी शाळा असून या शाळेचा दरवर्षी शंभर टक्के निकाल लागतो. याही वर्षी शाळेचा दहावी बोर्ड चा निकाल शंभर टक्के लागला असून यामध्ये सर्वसामान्य व शेतकरी कुटुंबातून आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सतत अभ्यास करून कुठलीही शिकवणी किंवा शिक्षणाचा वारसा नसताना अंजली संतोष झिरमिरे या विद्यार्थिनीने ८६% गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला आहे. सावली जिल्हा परिषद शाळेतील शालेय समितीच्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांना सुरक्षा व शाळेतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता कशी वाढली वाढली जाते याकडे सातत्याने लक्ष दिले जात व शालेय समितीच्या माध्यमातून जावळीकरांना आवाहन करण्यात येते की आपल्या विद्यार्थ्याला गावातील जिल्हा परिषद प्रशालेतच शिक्षणासाठी प्रवेश घ्यावा असं यावेळी शालेय समितीच्या वतीने आव्हान करण्यात आले आहे. आज दहावी बोर्डात द्वितीय क्रमांक पटकावल्यानंतर अंजली संतोष झिरमिरे या विद्यार्थिनीचा औक्षण करत पेढे भरत हे त्वचेत सत्कार संपन्न झाला.. अहेमद पटेल ,राजकुमार ठमके,विठ्ठल थोरात ,तुळशिराम आळणे,सतिष आळणे,बाळु कांबळे ,शाहुराज कांबळे ,महेबुब पटेल ,सद्दाम पटेल ,अलिम पटेल ,दादा सय्यद ,आमोल सातपुते ,सह जावळी ग्रामस्थ उपस्थित होते

## गोकुळवाडीच्या भूमिपुत्राचा महाराष्ट्र पोलीस दलात मानाचा ठसा

# मारुती शिरबरतळ यांची PSI पदी निवड; गावात भव्य नागरी सत्कार

दैनिक वादळ वार्ता

**मुखेड । प्रतिनिधी**

तालुक्यातील गोकुळवाडी गावचे सुपूत्र तथा कष्टकरी कुटुंबातील होतकरू युवक श्री. मारुती रामदास शिरबरतळ यांनी जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर महाराष्ट्र पोलीस दलात 'पोलीस उपनिरीक्षक' (PSI) पदाला गवसणी घालत गावासह संपूर्ण तालुक्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल गोकुळवाडी येथे भव्य नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यास आमदार तुषार राठोड यांनी प्रमुख उपस्थिती लावून मारुती शिरबरतळ यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी त्यांनी मारुती यांच्या यशामागील संघर्ष, मेहनत आणि जिद्दीचे कौतुक करत शून्यातून विश्व निर्माण करणाऱ्या अशा ध्येयवेड्या तरुणांमुळे समाजाचा गौरव वाढतो. ग्रामीण भागातील युवकांसाठी मारुती हे प्रेरणास्थान आहेत, असे गौरवोद्गार काढले.




आमदार तुषार राठोड यांनी पुढे बोलताना, मारुती शिरबरतळ यांनी आपल्या कर्तृत्वाने गोकुळवाडीचे नाव महाराष्ट्र पोलीस दलात अभिमानाने कोरले आहे. त्यांच्या पुढील यशस्वी वाटचालीस माझ्याकडून आणि संपूर्ण मतदारसंघाकडून मनःपूर्वक शुभेच्छा, असे सांगितले.या सत्कार सोहळ्यास गुरुवर्य महंत विशुद्धानंदजी महाराज, तहसीलदार विकास बिरादार, भाजपा विधानसभा प्रमुख खुशालराव पाटील उमरदरीकर, पंचायत समिती सभापती लक्ष्मणराव पाटील खैरकेकर, भाजपा जिल्हा चिटणीस किशोरसिंह चौहान, गणेश पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संतोष बोनलेवाड, पोलीस उपनिरीक्षक नरहरी फड, भाजपा तालुका ओबीसी अध्यक्ष शिवा आलेवार बेळीकर, नगरसेवक पंडित पाटील बेळीकर, धनंजय कोडगिरे, शिवाजी राठोड, पांडुरंग पाळेकर, सरपंच मोरे, महेश सावकार चौधरी, गणेश आंबेकर, पवन शिरबरतळ यांच्यासह ग्रामस्थ, माता-भगिनी आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मारुती शिरबरतळ यांच्या यशामुळे गोकुळवाडी गावात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या कर्तृत्वामुळे ग्रामीण भागातील अनेक तरुणांना नवी प्रेरणा मिळत आहे.

# SC आरक्षण उपवर्गीकरणाविरोधात तीव्र संताप : उपविभागीय अधिकारी भूम यांच्यामार्फत राज्याच्या मुख्य सचिवांना निषेध निवेदन

दैनिक वादळ वार्ता

**भूम । प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाकडून अनुसूचित जाती (SC) आरक्षणाच्या उपवर्गीकरणासंदर्भात सुरू असलेल्या हालचालींविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) व रिपब्लिकन सेनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. यासंदर्भात उपविभागीय अधिकारी भूम यांच्यामार्फत राज्याचे मुख्य सचिव,यांना निषेध निवेदन देण्यात आले.या निवेदनामध्ये राज्य सरकार दलित समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. संविधानाने अनुसूचित जाती समाजाला दिलेले आरक्षण हे संपूर्ण समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व राजकीय उन्नतीसाठी असून, त्याचे उपवर्गीकरण करणे म्हणजे संविधानिक हक्कांवर आघात असल्याचे नमूद करण्यात आले आहे.तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या समता, बंधुता व सामाजिक न्यायाच्या विचारांच्या विरोधात शासनाची भूमिका असल्याचा आरोप करत, आरक्षणाचे वर्गीकरण करून समाजाचे विभाजन करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे.न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल अद्याप सार्वजनिक करण्यात आलेला नसताना त्यावर आधारित निर्णय प्रक्रिया राबविणे हे लोकशाही व पारदर्शकतेच्या तत्वांच्या विरोधात असल्याचे सांगण्यात आले. शासनाने समितीचा संपूर्ण अहवाल तात्काळ जनतेसमोर जाहीर करावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांनी शासनाने डउ आरक्षण उपवर्गीकरणाची प्रक्रिया तात्काळ रद्द करावी अशी मागणी केली.यावेळी रिपब्लिकन सेनेचे भुम तालुकाध्यक्ष मुकुंद लगाडे यांनीही शासनाच्या निर्णयाचा तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी निवेदनावर महावीर गायकवाड जिल्हा कार्याध्यक्ष, बाबासाहेब ओव्हाळ, जिल्हा उपाध्यक्ष, आदिची उपस्थिती होती.

# केजमध्ये 'आमदार चषक' क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

# युवा नेते अक्षय भैयांच्या वाढदिवसा निमित्त भव्य आयोजन!

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

दि.१३ मे रोजी केज मतदार संघाचे युवा नेते अक्षय भैया नंदकिशोर मुंदडा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून अक्षय भैया मित्र मंडळच्या वतीने आयोजित भव्य आमदार चषक क्रिकेट स्पर्धेचे बुधवारी पंचायत समितीच्या मैदानावर उत्साहात उद्घाटन झाले. क्रीडाप्रेमींची मोठी उपस्थिती आणि मान्यवरांच्या मांदियाळीत या स्पर्धेचा बिगुल वाजला आहे.दिग्गजांच्या हस्ते झाले.स्पर्धेचे उद्घाटन रणजितसिंह पाटील,डॉ. दत्तात्रय केंद्रे,नेताजी शिंदे,वसंत भाऊ केदार, डॉ.वासुदेव नेहरकर, भगवान केदार,महादेव अण्णा सूर्यवंशी,डॉ. दिनकर राऊत आणि विनोद गुंड या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी मान्यवरांनी अक्षय भैयांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत खेळाडूंना खिलाडूवृत्तीने खेळण्याचे आवाहन केले.



या स्पर्धेत विजेत्या संघांसाठी आकर्षक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत.प्रथम बक्षीस- शानदार रायडर (ढे थहशशश्रशी),द्वितीय बक्षीस ५१ हजार रुपये रोख इतर अनेक वैयक्तिक आणि सांघिक आकर्षक बक्षिसे.

आयोजक व संयोजकांची मोठी फळी

स्पर्धेचे नियोजन यशस्वी करण्यासाठी मुख्य आयोजक सुनील घोळवे, खद्दीर कुरेशी,शिवाजी पाटील,राहुल भैयागदळे, शरद भैया इंगळे,सुरेश नांदे सर,अनिरुद्ध शिंदे आणि विष्णू थोरात यांनी विशेष परिश्रम घेत आहेत.तसेच संयोजक म्हणून प्रकाश मुंडे, किरण सारूक सर, झहीरुद्दीन हाफी साहेब इनामदार आणि प्रमोद भैया मस्के हे स्पर्धेच्या यशस्वितेसाठी कार्यरत आहेत.उद्घाटन सामना मुंडेवाडी विरुद्ध मांगवडगाव या दोन संघात खेळण्यात आला. तो सामना मुंडेवाडीने जिंकला.उद्घाटन प्रसंगी केज शहरातील नागरिक, तरुण आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती.पंचायत समितीचे मैदान प्रेक्षकांच्या गर्दीने ओसंडून वाहत होते. अक्षय भैयांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या क्रीडा सोहळ्याने शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी काही दिवस केजमध्ये क्रिकेटचा मोठा थरार पाहायला मिळणार आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077